# समिती दर्पण

मार्च २०२६

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


### समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात आठ आणि नगरमध्ये दोन अशी दहा वसतिगृहे आहेत. त्यात १३५० हून अधिक विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर सात दशके समितीचे काम चालते.

# विद्यार्थी प्रमुखपद घडविते परिपूर्ण व्यक्तिमत्त्व

**विद्यार्थी साहाय्यक समितीच्या प्रत्येक वसतिगृहात विद्यार्थी व्यवस्थापनामध्ये एका विद्यार्थ्याची विद्यार्थी प्रमुख म्हणून निवड केली जाते. वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे प्रश्न, अडचणी समजून घेणे, त्यावर उपाय शोधणे, गरज पडल्यास पर्यवेक्षकांची, कर्मचारी किंवा कार्यकर्त्यांची मदत घेणे, त्याचबरोबर वसतिगृहात शिस्त, शांतता आणि समन्वय राखणे, अशी या पदाची जबाबदारी असते. वसतिगृहात पर्यवेक्षकाखालोखाल सहपर्यवेक्षक असा या पदाचा मान असतो. त्यामुळे विद्यार्थी प्रमुख म्हणून काम करणे, ही अभिमानाची गोष्ट असते. ग्रामीण भागातून येणारे विद्यार्थी समवयस्क विद्यार्थी प्रमुखाशी मोकळेपणाने बोलू शकतात. त्यातून त्यांच्या अडचणी समजतात, हा एक उद्देश आहेच, पण त्याचबरोबर विद्यार्थी प्रमुख म्हणून काम करताना संबंधित विद्यार्थ्याला जबाबदारीची जाणीव होते, प्रश्न हाताळण्याची, निर्णय घेण्याची क्षमता वृद्धिंगत होते, त्याच्यातील नेतृत्व गुणाचा विकास होतो. संवाद कौशल्य सुधारते. यावर्षी ही जबाबदारी सांभाळणाऱ्या विद्यार्थ्यांचा अनुभव त्यांच्या शब्दांत.**

### अधिक परिपक्व होत गेलो



अनुभवातून शिकत, सर्वांना सोबत घेत आणि शिस्तीच्या अधिष्ठानावर काम करीत मी अधिक परिपक्व होत गेलो. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, जबाबदारी, सामूहिकता आणि मूल्याधिष्ठित विचार रुजवण्याचा प्रयत्न करताना, माझेही व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होत गेले. मी पदवी अभ्यासक्रमात (MCA) विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवला असून, नामांकित संस्थेमध्ये माझी निवड झाली आहे. मुलाखतीदरम्यानदेखील विद्यार्थी प्रमुख म्हणून केलेल्या कार्याचा आणि नेतृत्व अनुभवाचा उल्लेख विशेषत्वाने झाला, ज्यामुळे आत्मविश्वास अधिक दृढ झाला.

**- नीलेश गोराडे,** हरिभाऊ फाटक वसतिगृह

### अंगीभूत कौशल्यांना मिळाला वाव



वसतिगृह यावर्षीच सुरू झाल्यामुळे सुरुवातीपासूनच त्याची शिस्त, व्यवस्थापन आणि वातावरण घडविण्यात मला सक्रिय भूमिका निभावण्याची संधी मिळाली. त्यातून नेतृत्व, समन्वय आणि प्रभावी संवाद ही कौशल्ये विकसित झाली. विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित, स्वच्छ आणि अभ्यासासाठी पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविताना निर्णयक्षमता आणि आत्मविश्वास अधिक बळकट झाला. शांतपणे व संयमाने काम करण्याची सवय लागली. या अनुभवातून मिळालेले धडे आणि मूल्ये मला मार्गदर्शक ठरतील.

**- रोहन मुळे,** कल्याणराव जाधव वसतिगृह

### टीमवर्कची ताकद समजली



विद्यार्थी प्रमुख म्हणून काम करताना अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. जसे की, समोरच्याच्या समस्या ऐकून घेऊन, त्यावर योग्य निर्णय घेणे, सर्वांना सोबत घेऊन पुढे जाणे. ही जबाबदारी पार पाडताना आत्मविश्वास वाढत गेला. निर्णय क्षमता वाढली. लोकांशी संवाद साधण्याची सवय लागली. सर्वांना बरोबर घेऊन काम करण्यातील ताकद समजली.

**- राधा गडशिला,** लतिका गायतोंडे वसतिगृह

### व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल



विद्यार्थी प्रमुख म्हणून काम करताना विविध जबाबदाऱ्या पार पाडता आल्या, जसे की विद्यार्थ्यांच्या समस्या समजून घेणे, त्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करणे, शिस्त राखणे तसेच सर्वांमध्ये समन्वय साधणे. या कामातून माझ्यामध्ये सकारात्मक बदल झाला. नेतृत्वगुणांमध्ये वाढ झाली, निर्णयक्षमता अधिक स्पष्ट झाली, जबाबदारीची जाणीव अधिक बळकट झाली. लोकांशी संवाद साधण्याची आणि त्यांचे विचार ऐकण्याची सवय लागली. मला भविष्यातही अशाच प्रकारे काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

**- सायली शरद भामे,** मुलींचे नवीन वसतिगृह- ए विंग

### जबाबदारी, संयम यांचा अर्थ उमगला



विद्यार्थी प्रमुख म्हणून काम करताना मला नेतृत्व, जबाबदारी आणि संयम यांचा खरा अर्थ समजला. अनेक आव्हाने आली, त्यांना मी आत्मविश्वासाने आणि सकारात्मक दृष्टिकोनातून सामना केला. माझ्या व्यक्तिमत्त्वात मोठा बदल झाला. मी अधिक जबाबदार आणि निर्णयक्षम झाले. समितीतील सर्व सदस्यांचे सहकार्य आणि पाठिंबा मिळाला. एकत्र काम करताना टीमवर्क, समन्वय आणि परस्पर आदर यांचे महत्त्व जाणवले. मला केवळ एक जबाबदारीच नाही, तर आयुष्यभर उपयोगी पडणारे धडे मिळाले.

**- देवयानी सोनवणे,** सुमित्रा सदन

### प्रत्येक दिवस नवे काही शिकविणारा



विद्यार्थी प्रमुख ही माझ्यासाठी केवळ जबाबदारी नसून स्वतःला घडविण्याची संधी आहे, असे मी मानते. हे काम करताना माझा आत्मविश्वास वाढला. मला नेतृत्व, टीमवर्क आणि वेळेचे नियोजन यांसारखी कौशल्ये शिकायला मिळाली. ही जबाबदारी माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे आणि प्रत्येक दिवस काहीतरी नवीन शिकवणारा आहे.

**- पूजा रोहिदास अमृप,** मेधावी वसतिगृह

### आयुष्य घडवणारी संधी



गेल्या पाच वर्षात समितीमध्ये राहात असताना आणि समितीच्या विद्यार्थी व्यवस्थापनामध्ये काम करीत असताना माझ्यामध्ये वैचारिक प्रगल्भता आली. समितीच्या विद्यार्थी व्यवस्थापनामध्ये विविध जबाबदाऱ्या मिळाल्या. प्रत्येक जबाबदारीमधून मला जीवनभर पुरेल इतका अनुभव आणि शिकवण मिळाली. सलग दोन वर्षे विद्यार्थी प्रमुख म्हणून काम करताना माझ्यामध्ये अनेक सकारात्मक बदल झाले.

**- ओंकार सुवर्णा रामदास शिंदे,** लजपत संकुल वसतिगृह

### आत्मविश्वास वाढला



काम करताना अत्यंत समृद्ध अनुभव मिळाला. नेतृत्व गुण, समन्वय आणि संवाद कौशल्य विकसित झाले. विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेऊन उपाय शोधताना माझ्यातील निर्णयक्षमता आणि आत्मविश्वास वाढला. विद्यार्थिनींमध्ये शिस्त, सहकार्य आणि एकात्मतेची भावना निर्माण करण्याचा मी प्रयत्न केला. विद्यार्थी प्रमुख म्हणून काम करताना माझ्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल झाला. आयुष्यासाठी मला एक नवी दिशा आणि प्रेरणा मिळाली.

**- अनुष्का राउत,** डॉ. अ. शं. आपटे वसतिगृह

### वैयक्तिक विकासाला चालना



मिळालेल्या संधींमुळे माझ्या शैक्षणिक आणि वैयक्तिक विकासाला मोठी चालना मिळाली. विद्यार्थी प्रमुख म्हणून वसतिगृहातील सुविधा, स्वच्छता, पाणी, जेवणाची गुणवत्ता आणि अभ्यासासाठी आवश्यक वातावरण सुधारण्याच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेता आला. नवीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यातून मला नेतृत्व, संवाद कौशल्य आणि समाजकार्याची खरी जाणीव झाली.

**- हर्षद मंगेश उनकुले,** पी. डी. कारखानीस

### संघभावना व वेळेचे महत्त्व समजले



हे काम करताना अनेक नवीन अनुभव मिळाले. पर्यवेक्षिका आणि कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनामुळे काम अधिक सोपे झाले. या अनुभवातून शिस्त, संघभावना व वेळेचे महत्त्व समजले. प्रत्येक काम जबाबदारीने पूर्ण करण्याची सवय लागली. समोरच्यांच्या समस्या ऐकून घेऊन त्यावर योग्य निर्णय घेताना माझ्यात खूप सकारात्मक बदल होत गेले. अडचणींना सामोरे जाण्यासाठी आणि समस्या सोडवण्याची क्षमता वाढली. निर्णय क्षमता, आत्मविश्वास आणि टीमवर्क ही कौशल्ये विकसित झाली.

**- मयुरी शेळके.** कै. मधुभाऊ चौधरी वसतिगृह, अहिल्यानगर

# ‘रोबोटिक्स’मधील यशस्वी शाळांचा गौरव

## समितीतील ८० मुलांनी पुण्यातील १० शाळांमध्ये दिले धडे

हैदराबाद येथील सोहम अकॅडमी ऑफ ह्युमन एक्सलन्स ही संस्था गेल्या वर्षापासून विद्यार्थी साहाय्यक समितीबरोबर कार्यरत आहे. या संस्थेच्या रोबोटिक्स इन अकॅडमिक्स या उपक्रमांतर्गत पुण्यातील दहा शाळांमध्ये रोबोटिक्स प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. या शाळांमधील विद्यार्थ्यांनी विविध रोबोटिक्स चॅलेंजेस पूर्ण करून आपले कौशल्य दाखविले.

या उपक्रमाची सुरुवात २१ सप्टेंबरला समितीत झालेल्या रोबोटिक्स कार्यशाळेद्वारे झाली. यात समितीतील ८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या विद्यार्थ्यांना रोबोटिक्सचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यानंतर याच विद्यार्थ्यांनी रोबोटिक्स शिक्षक म्हणून विविध शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या उपक्रमात सहभागी झालेल्या काही शाळांनी ग्रँड मास्टर लेव्हल म्हणजेच सात रोबोटिक्स चॅलेंजेस यशस्वीरित्या पूर्ण केले. अव्वल आलेल्या तीन शाळांना २८ फेब्रुवारी रोजी हैदराबाद येथे झालेल्या रोबोटिक्स प्रदर्शनामध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. विद्यार्थी समन्वयक सूरज सुरवसे आणि समिती प्रतिनिधी म्हणून शुभांगी चिरपुटकर हैदराबादला गेले होते.

या उपक्रमातील सहभागी शाळा व विद्यार्थ्यांचा सत्कार समितीत करण्यात आला. यावेळी चार शाळांमधील विद्यार्थ्यांनी आपले रोबोटिक्स प्रोजेक्ट प्रदर्शित केले. ग्रँड मास्टर लेव्हल पूर्ण केलेल्या शाळांना ट्रॉफी देऊन सन्मानित केले. या उपक्रमात सुमारे दीडशे विद्यार्थी सहभागी होते.



यावेळी खजिनदार संजय अमृते, प्रकल्प संयोजक हेमंत राजहंस, शुभांगी चिरपुटकर, कार्यकर्ते प्रदीप मांडके, दिनकर वैद्य, वल्लभ कोल्हटकर, मेधा पंडित, मकरंद जोगळेकर, मुख्य विकास अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी उपस्थित होते.


तयाचा वेलू...

# शिस्त, कामाची सवय, साधेपणा हीच यशाची सुत्रे

साधारण पन्नास वर्षांपूर्वी लोणावळ्यात राहणाऱ्या, पोटापुरती शेती आणि भिक्षुकी करणाऱ्या व्यक्तीने आपल्या मुलाला गंगाधर हवालदार यांना कमर्शियल आर्ट्ससारखे बेभरवशाचे शिक्षण घ्यायला परवानगी कशी दिली, असा प्रश्न साहजिकच कोणालाही पडेल. त्यांना तो विचारल्यावर ते म्हणाले, भविष्याची काळजी हा विषयच त्यांच्या डोक्यात कधी आला नव्हता आणि त्यामुळे मला हे करिअर करता आले. हवालदार म्हणाले, "शाळेपासून माझे ड्रॉइंग छान! ड्रॉईंगच्या सराना त्याचे खूप कौतुक. मी लहान असताना चित्रकलेच्या परीक्षा देण्यासाठी ते मला पुण्याला घेऊन आले होते आणि उशीर व्हायला लागला म्हणून त्यांनी मला कडेवर घेऊन सेंटरला पोचवले होते."

पुण्यात अभिनव कला महाविद्यालयात प्रवेश मिळाल्यावर समितीबद्दल कळले आणि प्रवेशही मिळाला. हवालदार तेव्हाच्या बंगलेवजा वसतिगृहात, नंतर लजपत आणि त्यानंतर आपटे वसतिगृहात राहिले. कलाकारांविषयी तांबोळी सरांच्या मनात आस्था होती. समितीमध्ये कला क्षेत्रातील निदान चार- पाच मुले असावीत, असा सरांचा आग्रह होता.

"कुठलाही कार्यक्रम असला, की आम्हाला सर बोलवायचेच. तो छान झाला पाहिजे, ह्यावर त्यांचा कटाक्ष असायचा. काम छान झाले की शाबासकी मिळायची. होस्टेलमध्ये दंगा होत असेल, तेव्हा पहिले लक्ष आमच्याकडेच असायचे. इतर मुलांचा अभ्यास शांतपणे असायचा, पण आम्हाला मात्र सबमिशन गप्पा मारत, दंगा करत, गाणी ऐकत.. करता यायच्या. त्यामुळे शिक्षा पण व्हायची."



*गंगाधर हवालदार*

अभिनवमध्ये असल्यामुळे त्यांना निर्मलाताईंबरोबर काम करण्याची संधी मिळाली, त्यांच्याकडून खूप काही शिकता आलं. यादवराव कुलकर्णी, कॅप्टन नांगरे, राजाभाऊ पटवर्धन, सहाय्य संकलन बघणारे भानू सर या सगळ्यांच्या छान आठवणी आहेत. ते स्वतः सदाशिव पेठांमधून संकलनासाठी जायचे. समितीचे काम चांगले म्हणून अगदी महिना सव्वा रुपयांपासून मदत करणारी कुटुंबे त्यांनी पाहिली आहेत.

अच्युतराव आपटे सरांची एक हृद्य आठवण त्यांनी सांगितली. "मी सरांकडे काही कामासाठी जायचो. सर शिस्तीचे आणि वक्तशीर. एकदा मला उशीर झाला. त्यांनी खूप झापले. मी तणावातच काम पूर्ण केले. काम झाल्यावर निघताना सरांनी विचारले, 'उशीर का झाला?' मी म्हणालो, कॉलेज संपवून हॉस्टेलमध्ये जाऊन जेवून आलो. मी पायी जातो-येतो म्हणून उशीर झाला. सर सगळ्या मुलांशी आदरार्थी बोलत. 'सायकल नाही का तुमच्याकडे??' त्यांनी मला विचारले. मी नाही म्हणालो. ताबडतोब त्यांनी मला एक पत्ता दिला. 'तिथे जा, हवी ती सायकल घ्या. मी त्यांचे पेमेंट करतो. मला हप्त्याने पैसे परत करा."



आपटे सरांनी वेळेवर मदत केली, पण दान नव्हे. मुलांना वस्तूची किंमत, महत्त्व कळावे, त्यांचा आत्मसन्मान पण जपला जावा, हे भान ठेवले.

तांबोळी सर पालकत्व योजनेचे जनक. पालक आमचा या शहरातला आधार होता. मुख्यत्वे मानसिक. अडीअडचणीला आपले कोणीतरी जवळ आहे ही खात्री. ज्याची आम्हाला खूप गरज होती.

आर्टिस्टचे करिअर बेभरवशाचे, पण झोकून देऊन काम करणे, सातत्य राखणे, कायम उत्तमच देण्याचा प्रयत्न करणे, माणसे जोडत राहणे, ही हवालदार यांच्या दृष्टीने यशाची सुत्रे आहेत. समितीमुळे लागलेली शिस्त, कामाची सवय, साधेपणा या सगळ्या गुणांमुळे करिअरमध्ये अडथळा आला नाही.

जीडी आर्ट झाल्यानंतर त्यांनी पुण्यातील वेगवेगळ्या जाहिरात एजन्सीमध्ये काम केले, फ्रीलान्सिंग केले. प्रिंट मीडिया ते ऑनलाइन... जाहिरात क्षेत्रातील मोठ्या बदलाचे ते साक्षीदार आहेत. ते समितीसाठी कायम कार्यरत आहेत. स्टुडंट वेलफेअर असोसिएशनचा नवा लोगो त्यांनी केला आहे. श्री. प्रतापराव पवार यांच्यावर आधारित समितीचा विशेषांक, तांबोळी सरांचा गौरव विशेषांक, समितीला पन्नास वर्षे पूर्ण झाली तेव्हाची स्मरणिका, मॅगेझिन्स, समितीच्या टेबल कॅलेंडरवर असलेली काही चित्रे, अशा विविध ठिकाणी त्याचे योगदान आहे.

जाहिरात क्षेत्र हे करिअर पण चित्रकला हा आणि चारोळ्या करणे हे त्यांचे छंद आहेत. त्यांचा मुलगा वकील आहे आणि सून होमिओपॅथी डॉक्टर. ते सांगतात, "ज्या परिस्थितीतून मी आज इथपर्यंत आलो, त्याचा मला खूप अभिमान आहे. त्या यशात समितीचा खूप मोठा वाटा आहे आणि त्याबद्दल मी कायम कृतज्ञ आहे."

**(शब्दांकन- माधवी कुलकर्णी)**

### मेळावा

(एका माजी विद्यार्थी मेळाव्याला जाऊन आल्यावर **गंगाधर हवालदार** यांनी लिहिलेली कविता.)

तो आठवणींचा सोहळा,
तो कल्लोळ भावनांचा।
ती माणसे देवासारखी,
तो परिसर मंतरलेला।
ती किनार रूपेरी होती,
तो प्रवास सोनेरी।
ती जपून ठेवावी अशी,
ती आठवण मोरपिशी।
विसरून गेले सारे,
वय आपुले थोडावेळ।
वर्तमान हसला वेडा,
भूतकाळाचा पाहून भाव।

समिती वृत्त

## राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त खोडदच्या महादुर्बिणीला भेट

विद्यार्थी विकास केंद्राच्या सायन्स क्लबच्या वतीने राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त खोडद येथील जीएमआरटीमध्ये विज्ञान अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

या सहलीत विद्यार्थ्यांना रेडिओ खगोलशास्त्र व अंतराळ संशोधनाचे महत्त्व समजले. जेएमआरटी या अत्याधुनिक वैज्ञानिक संशोधन संस्थेचे कार्य कशा प्रकारे चालते, याची माहिती मिळाली. महादुर्बिणीचे कार्य प्रत्यक्ष पाहून समजले. अंतराळातील ग्रह, उपग्रह, लघुग्रह पट्टा, सूर्य व पृथ्वी यांविषयी वैज्ञानिक माहिती मिळाली. शून्य सावली दिन, लोणार सरोवर निर्मिती व पदार्थांच्या चार अवस्था यांविषयी ज्ञान वाढले. संस्थेतील विज्ञान प्रदर्शनातून भारतीय अवकाश संशोधनाची प्रगती अनुभवता आली. पर्यावरण व आरोग्यविषयक जनजागृती उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या सहलीदरम्यान शिवनेरी किल्ल्यालाही भेट दिली.



# विद्यार्थी विकास केंद्राच्या 'अंकुर' अंकाचे प्रकाशन

विद्यार्थी विकास केंद्राच्या अंकुर २०२५– २६ या नियतकालिकाचे प्रकाशन नुकतेच उत्साहात आणि आनंदाच्या वातावरणात झाले.

प्रकाशन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून समितीचे माजी विद्यार्थी व प्रसिद्ध लेखक ज्ञानेश्वर जाधवर, समितीच्या माजी विद्यार्थिनी व कवयित्री गीता भावसार उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांच्या साहित्यिक अभिव्यक्तीचे कौतुक करीत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला नवे व्यासपीठ मिळते, असे मत पाहुण्यांनी व्यक्त केले. कोरोना काळानंतर काही कारणांमुळे 'अंकुर'चे प्रकाशन बंद होते. यावर्षी डॉ. ज्योती गोगटे, डॉ. मकरंद फडके, सीमा होस्कोटे आणि प्रभाकर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे नियतकालिक पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. अंकासाठी प्रणय पाले, स्नेहल कुलकर्णी आणि जीवन बोधले यांनी सहकार्य केले. अंकाचे मुखपृष्ठ श्रुती आगलावे या विद्यार्थिनीने केले.



मनोगत

## अनुभवला युद्धाचा थरार

इंदिरा युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ बिझनेसमध्ये एमबीएच्या (Financial Management) पहिल्या वर्षात मी शिकत आहे. या अभ्यासक्रमांतर्गत मला इंदिरा युनिव्हर्सिटीतर्फे दुबईत Middlesex University मध्ये आयोजित Immersion Program (२२ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी) मध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. या कार्यक्रमासाठीचा संपूर्ण खर्च मला युनिव्हर्सिटीकडून स्कॉलरशिपद्वारे मिळाला.



या कार्यक्रमादरम्यान AI, Sustainability, Leadership आणि Design Thinking यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांकडून मोलाचे ज्ञान मिळाले. त्याचबरोबर संयुक्त अरब अमिरातीतील विविध पर्यटन स्थळांना भेट देण्याची संधी मिळाली, ज्यामुळे माझा दृष्टिकोन अधिक व्यापक झाला.

आमची भारतात परतण्याची फ्लाइट २८ फेब्रुवारीला रात्री पावणेअकराला होती. त्याच दिवशी इराणकडून यूएईमधील यूएस बेसवर हल्ला झाला. सुरक्षेच्या कारणास्तव यूएईने आपली हवाई हद्द बंद केली. सर्व आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द केली. अचानक निर्माण झालेल्या या परिस्थितीमुळे भीती आणि अनिश्चिततेचे वातावरण तयार झाले. पुढे काय होणार, आपण भारतात कधी परतू शकू, याची कोणालाच कल्पना नव्हती.

या कठीण परिस्थितीत इंदिरा युनिव्हर्सिटीने आम्हा ८८ विद्यार्थ्यांची राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था व्हिल ऑफ इनोव्हेशनमार्फत केली. युनिव्हर्सिटीच्या प्रमुख तरिता शंकर आणि डीन शिखा सिंधू यांनी आमच्या सुरक्षित परतीसाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिल्यानंतर, त्यांनी आमच्यासाठी चार्टर विमानाची व्यवस्था केली.

फुजेराह विमानतळावर असताना देखील परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण होती. सतत फोनवर अॅलर्ट येत होते. आमच्यापासून साधारण सहा किलोमीटर अंतरावर क्षेपणास्त्र हल्ला झाल्याची माहिती मिळाली. त्या हल्ल्यामुळे निर्माण झालेला धूर आणि आग आम्ही विमानातून प्रत्यक्ष पाहिली. त्या क्षणी मनात भीती, चिंता आणि अनिश्चिततेचे वादळ उसळले होते. तरीता शंकर मॅडम यांचे अथक प्रयत्न आणि एकनाथ शिंदे यांच्या मदतीमुळे आम्ही ३ मार्च रोजी रात्री सुखरूप भारतात परतलो.

या अनुभवातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, जेव्हा दोन देशांमध्ये संघर्ष सुरू असतो, तेव्हा त्याचा सर्वाधिक परिणाम सामान्य नागरिकांवर होतो. ही घटना माझ्यासाठी आयुष्यभर लक्षात राहणारा जिवंत अनुभव आहे.

**- राजलक्ष्मी बळीराम मोटे,**
मुलींचे नवीन वसतिगृह - ए विंग

## महिला सेवा मंडळाची विद्यार्थिनींना ओळख

महिला सेवा मंडळ आणि मेधावी वसतिगृह यांच्या वतीने महिला दिनानिमित्त एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमामुळे वसतिगृहातील विद्यार्थिनींना महिला सेवा मंडळ व मेधावी वसतिगृह यांची नव्याने ओळख झाली.

कार्यक्रमात महिला सेवा मंडळाच्या प्रतिनिधींनी त्यांच्या संस्थेची ओळख करून दिली. संस्थेची उद्दिष्टे, तसेच महिलांचे शिक्षण, स्वावलंबन आणि आरोग्यासाठी संस्था राबवित असलेले उपक्रम याबद्दल माहिती दिली.

त्यानंतर मंडळ आणि विद्यार्थी साहाय्यक समिती यांच्या संयुक्त प्रयत्नातून राबविण्यात येत असलेल्या मेधावी उपक्रमाची माहिती देण्यात आली. यावेळी घेण्यात आलेल्या खेळांमध्ये सर्व विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

# समाजाभिमुख दृष्टिकोन आणि नेतृत्व विकास

## पाच सत्रांच्या मालिकेत समितीतील ४० विद्यार्थ्यांचा सहभाग

समितीचे विद्यार्थी विकास केंद्र आणि ज्ञानप्रबोधिनी नेतृत्व संवर्धन केंद्राच्या वतीने 'नेतृत्व विकास मालिका' या पाच सत्रांच्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात समितीतील ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे, संघटन कौशल्य वाढविणे आणि समाजाभिमुख दृष्टिकोन निर्माण करणे, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रत्येक सत्रात नेतृत्वाचे विविध पैलू उलगडून सांगत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी देण्यात आली.

पहिले सत्र लतिका गायतोंडे वसतिगृहात झाले. यात डॉ. सौगंध देशमुख यांनी 'नेता कसा असावा?' या विषयावर मार्गदर्शन केले. दुसरे सत्र पुसाळकर हॉलमध्ये झाले. या वेळी अमित कदम यांनी 'कार्यक्रमाची प्रभावी आखणी' या विषयावर मार्गदर्शन करीत उद्दिष्ट निश्चिती, जबाबदाऱ्यांचे विभाजन, वेळेचे व्यवस्थापन आणि समन्वय यांचे महत्त्व स्पष्ट केले. डॉ. आपटे वसतिगृहात झालेल्या तिसऱ्या सत्रात अखिलेश कसबेकर यांनी गटबांधणी, टीमवर्क आणि शोधबोध (आढावा व आत्मपरीक्षण) या विषयावर मार्गदर्शन केले. सुमित्रा सदनमध्ये झालेल्या चौथ्या सत्रात डॉ. दीपक गुप्ते यांनी 'भावना व्यवस्थापन आणि नेतृत्व' या विषयावर मार्गदर्शन केले. REBT (Rational Emotive Behavior Therapy-तर्कशुद्ध भावनिक वर्तन थेरपी) या संकल्पनेच्या माध्यमातून नेतृत्व करताना येणारे ताणतणाव आणि मतभेद संतुलितपणे हाताळण्याचे तत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

मालिकेचे अंतिम सत्र ज्ञानप्रबोधिनीतील (पुणे) उपासना मंदिरात झाले. या सत्रात ज्ञानप्रबोधिनीचे कार्यवाह महेंद्रभाई सेठिया यांनी समितीतील नेतृत्वापासून समाज व राष्ट्राच्या नेतृत्वापर्यंतची व्यापक दृष्टी विद्यार्थ्यांसमोर मांडली. या नेतृत्व विकास मालिकेत सहभाग घेतल्याबद्दल विद्यार्थी विकास केंद्राचे प्रमुख, सहाय्यक प्रमुख तसेच क्लब प्रमुखांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमाची संकल्पना, मांडणी आणि यशस्वी अंमलबजावणी प्रणय पाले यांनी डॉ. मकरंद फडके, डॉ. ज्योती गोगटे व सीमा होस्कोटे यांच्या मार्गदर्शनाखाली केली.





*मुंबईतील द्वारकाबाई ट्रस्टच्या वतीने देण्यात आलेल्या देणगीतून पुण्यातील मुलींच्या नवीन वसतिगृहातील एका खोलीचे उद्घाटन ९ मार्च रोजी सीमा उपळेकर आणि परिवाराच्या हस्ते झाले.*



*सरिता व प्रमोद कोतवाल यांनी दिलेल्या देणगीतून पुण्यातील मुलींच्या नवीन वसतिगृहातील तीन खोल्यांचे उद्घाटन सरिता व प्रमोद कोतवाल आणि कुटुंबीयांच्या हस्ते २२ मार्चला झाले.*

## जर्मन भाषा 'A1'मध्ये १९ विद्यार्थ्यांचे यश

विद्यार्थ्यांमध्ये परदेशी भाषेचे प्राथमिक ज्ञान विकसित करण्याच्या उद्देशाने घेण्यात येणाऱ्या जर्मन भाषा (A1 स्तर) अभ्यासक्रमात एकूण ९४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यापैकी १९ विद्यार्थी जर्मन A1 स्तराची परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थ्यांना १४ मार्च रोजी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांमध्ये जर्मन भाषेतील वाचन, लेखन, ऐकणे आणि बोलणे या मूलभूत कौशल्यांचा विकास करण्यावर विशेष भर देण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांनी जर्मन भाषेतील मूलभूत संकल्पनांचे चांगले आकलन दाखवून पुढील A2 स्तराच्या अभ्यासक्रमासाठी पात्रता मिळविली आहे. कार्यक्रमास गुरुसत्या राजशेखर, सुरेश कुमार (विभागप्रमुख, Rolls-Royce) उपस्थित होते.



## 'सिक्स सिग्मा ग्रीन बेल्ट'चे २२ विद्यार्थी ठरले मानकरी

अंकुर विद्यार्थी फाउंडेशन आणि समितीचे विद्यार्थी विकास केंद्र यांच्या सहकार्याने व इन्स्टिट्यूट ऑफ क्वालिटी अँड रिलायबिलिटी यांच्या मार्गदर्शनाखाली सिक्स सिग्मा ग्रीन बेल्ट प्रमाणपत्र प्रशिक्षण कार्यक्रम २३ ते २८ मार्च दरम्यान झाला. यामध्ये सहभाग घेतलेले सर्व २२ विद्यार्थी यशस्वी ठरले. त्यांना सिक्स सिग्मा ग्रीन बेल्ट प्रमाणपत्र देण्यात आले.

सिक्स सिग्मा ही उद्योगक्षेत्रात वापरली जाणारी जागतिक दर्जाची गुणवत्ता सुधारणा पद्धती असून, प्रक्रियेतील त्रुटी कमी करून कार्यक्षमता वाढविणे व समस्यांचे शास्त्रीय पद्धतीने निराकरण करणे, यासाठी ती प्रभावी मानली जाते. या प्रशिक्षण वर्गात प्राची मामदापूर, नितीन तिठे, डॉ. विकास गरुड, यशवंत महाकाळ तसेच हेमंत उध्दरिषे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



कार्यक्रमात समन्वयक म्हणून प्रणय पाले, विद्यार्थिनी वैष्णवी पांचाळ आणि जयंत हरिदास यांनी काम पाहिले. कार्यक्रमास कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, रत्नाकर मते, डॉ. ज्योती गोगटे आदी उपस्थित होते.

## सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांतील विजेत्या मुलामुलींचा गौरव

विद्यार्थी विकास केंद्राच्या वतीने वर्षभर घेण्यात आलेल्या विविध सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव आणि प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम २६ मार्चला झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून राजीव नंदकर (अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा संचालक, राज्य नागरी विकास संस्था- यशदा, पुणे) उपस्थित होते. तसेच एव्हरेस्टवीर भगवान चावले (एव्हरेस्टर) आणि युनियन बँक ऑफ इंडियाचे सहायक महाप्रबंधक शरद गोपाळे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

समितीच्या वसतिगृहांतील मुलामुलींसाठी वर्षभर सांस्कृतिक स्पर्धा घेण्यात आल्या. जल्लोष क्रीडा महोत्सवातील सांघिक खेळ, गणपती उत्सवातील आरास स्पर्धा तसेच रॉक क्लाइंबिंग कोर्स असे उपक्रमही झाले. यातील विजेत्या विद्यार्थ्यांना विशेष अतिथींच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच वसतिगृह व्यवस्थापनामध्ये सक्रियपणे सहभाग असणाऱ्या विद्यार्थी प्रतिनिधी व पर्यवेक्षकांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी राजीव नंदकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाबरोबरच क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.



## समितीशी नाळ तुटणार नाही; विद्यार्थ्यांची भावूक प्रतिक्रिया

संस्कारांची शिदोरी घेऊन बाहेर पडत असताना, समितीशी असलेली नाळ कधीही तुटणार नाही, अशी ग्वाही शेवटच्या वर्षाच्या विद्यार्थ्यांनी दिली, त्याचबरोबर यशस्वी कारकीर्द घडवून समितीसाठी योगदान द्या, असे सांगत हे नाते अधिक दृढ करण्याचे आवाहन कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी केले.

शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी सदिच्छा समारंभ भावनिक वातावरणात पार पडला. समिती वास्तव्यातील आठवणी सांगताना अनेक विद्यार्थी भावूक झाले. या कार्यक्रमाला दिनकर वैद्य, डॉ. ज्योती गोगटे यांच्यासह कार्यकर्ते, पर्यवेक्षक उपस्थित होते. या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी वसतिगृहातील विद्यार्थीही मोठ्या संख्येने सहभागी होते.

समितीने दिलेली शिकवण, मिळालेले प्रेम आणि आधार याविषयी भावना व्यक्त करताना अनेक विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रेया पवार आणि सुशील पुरी यांनी केले.

